# Golden Research Thoughts

International Recognized Multidisciplinary Research Journal

ISSN : 2231-5063 Impact Factor : 3.4052(UIF) Volume -5 | Issue - 9 | March - 2016


## "महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या सामाजिक आर्थिक स्तराचा त्यांच्या व्यक्तिमत्वावर पडणारा प्रभाव - एक अभ्यास ! "




राजश्री प्रसाद पानसे[१] , सुषमा मुकुंद गणोजे[२]

[१]पीएच्. डी. संशोधक, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ अमरावती.

[२]मार्गदर्शक , शासकीय शिक्षण महाविद्यालय, अकोला.



*महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या सामाजिक आर्थिक स्तराचा त्यांच्या व्यक्तिमत्वावर पडणाऱ्या प्रभावाचा अभ्यास या संशोधन विषयात करण्यात आलेला आहे. अमरावती विभागातील कला, वाणिज्य आणि विज्ञान शाखेतील एकूण ७५० विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली आहे. संशोधनासाठी सर्वेक्षण पध्दतीचा वापर करण्यात आला माहितीचे संकलनसाठी व्यक्तिमत्व चाचणी, सामाजिक आर्थिक स्थिती मापणी या साधनांचा वापर करण्यात आला. प्राप्त माहितीचे विश्लेषण आणि अर्थनिर्वचन करूण निष्कर्ष मांडण्यात आलेले आहेत.*


### १.१ प्रस्तावना :

"सत्यं, शिवं, सुंदरम् ! ही जीवनाची अंतिम मूल्ये, ती समजण्याची व अनुभवण्याची पात्रता मनुष्याला आणून देणारे ते खरे शिक्षण ! " - **प्लेटो,**

व्यक्तिला शारिरीक, मानसिक, भावनिक आणि अध्यात्मिकदृष्टया विकसित करण्याचे कार्य शिक्षणाच्या माध्यमातूनच घडत असते. शिक्षणाचे उदि्द्ष्ट मुळात 'व्यक्तिमत्त्वाची समृध्दी' हे आहे.

"नवीन परिस्थितीत केलेले समायोजन आणि नवीन व सामाजिक परिस्थितीत घडून येणारे वर्तन व्यवहार म्हणजे व्यक्तिमत्व !"

अशी व्याख्यात्मक संकल्पना मानसशास्त्रज्ञ सांगतात. मात्र व्यक्तिमत्त्वाचे अस्तित्त्व हे समाजाशिवाय शुन्य आहे. करण मानव हा 'समाजशील' प्राणी आहे. या संदर्भात, मॅकआयव्हर व पेज यांचे विचार महत्त्वपूर्ण आहेत ते म्हणतात,

"संरक्षण, सुविधा, पालनपोषण, शिक्षण, साधने, संधी, सेवा समाजच व्यक्तीला प्राप्त करून देतो तर व्यक्तिचे विचार, अनुभव, स्वप्न आशा-आकांक्षा परिपूर्ण करून सुख-समाधान प्राप्त करण्यास व्यक्तिला समाजाचीच मदत घ्यावी लागते."

यावरून असे सिध्द होते की, व्यक्तीच्या उत्तुंग यशामुळे समाजाला मोठेपणा मिळतो हे जितके खरे असते तितकेच हे ही खरे की, उत्तुंग यश मिळविणारी व्यक्ति ही समाजात राहूनच श्रेष्ठ व उत्तुंग कार्य करू शकते. म्हणजेच समाजाच्या मदतीनेच व्यक्ति आपल्या सामाजिक-आर्थिक स्तराला आणि व्यक्तिमत्त्वाला योग्य आकार देऊ शकते.

म्हणूनच महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या सामाजिक-आर्थिक-स्तराचा त्यांच्या व्यक्तिमत्वावर कसा परिणाम होतो, याचे अध्ययन प्रस्तुत संशोधनात करण्यात आले आहे.

### १.२ संशोधनाचे महत्व आणि गरज :

समाज आणि व्यक्ती दोन्ही परस्परपूरक गोष्टी आहेत. सामाजिक-आर्थिक स्तर आणि व्यक्तिमत्व परिवर्तनालाही बऱ्याच प्रमाणात विविध सामाजिक घटक जबाबदार असतात. प्रत्येक व्यक्ति आपल्या आयुष्यातील विविध टप्प्यात, वेगवेगळया परिस्थतीशी, समाजातील परिवर्तनांशी आपल्या सामाजिक-आर्थिक बदलांशी जुळवून घेत असतात. मात्र उच्च, मध्यम, निम्न सामाजिक-आर्थिक स्तराचा व्यक्तिमत्त्वावर परिणाम होतच असतो जसे उच्च सामाजिक-आर्थिक स्तरातील विद्यार्थ्यांना कौटुंबिक, शैक्षणिक, आर्थिक सुविधा, निम्न स्तरापेक्षा जास्त मिळतात ही मुले मानसिकदृष्टया समाधानी आढळतात तर निम्नस्तरातील विद्यार्थ्यांच्या प्राथमिक गरजाही पूर्ण होत नाहीत त्यामुळे व्यक्तिमत्त्व विकासात अडचणी निर्माण होतात.

जीवनाच्या सर्वच क्षेत्रात, आज वैज्ञानिक शोध व नव्या तंत्रज्ञानाने मानवी जीवन मात्र संपूर्णतः बदलून टाकले आहे. समाजात, राष्ट्रात भ्रष्टाचार, गुंडगिरी, आंतकवाद, बेशिस्त, बेरोजगारी उच्च महत्त्वाकांक्षा, विलासी जीवनाच्या संकल्पना, नैतिक मुल्यांचा ऱ्हास, कौटुंबिक दुरावा सतत वाढत आहे. अशा परिस्थितीत आजच्या महाविद्यालयीन विद्यार्थ्यांला स्वतःच्या व्यक्तिमत्त्वाला घडवतांना येणाऱ्या समस्यांना तोंड दयावे लागते म्हणूनच आधुनिक काळामध्ये महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासाला महत्वपूर्ण स्थान देण्यात आलेले आहे. अशा स्थितीत विद्यार्थ्यांच्या सामाजिक-आर्थिक-स्तराचा त्यांच्या व्यक्तिमत्वावर कोणता प्रभाव होतो याचा अभ्यास या संशोधनामध्ये करण्यात आलेला आहे.

### १.३ संशोधनाचे उदिद्ष्ट :

१. महाविद्यालयीन स्तरावरील कला, वाणिज्य आणि विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांचा सामाजिक आर्थिक स्तर आणि व्यक्तिमत्त्वाचा अभ्यास करणे.

२. महाविद्यालयीन कला, वाणिज्य आणि विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांच्या सामाजिक आर्थिक स्तराचा त्यांच्या व्यक्तिमत्वावर पडणाऱ्या प्रभावाचा अभ्यास करणे.

### १.४ संशोधनाच्या परिकल्पना :

१. महाविद्यालयीन स्तरावरील कला, वाणिज्य आणि विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांच्या सामाजिक आर्थिक स्तरामध्ये आणि व्यक्तिमत्वामध्ये सार्थक फरक नाही.

२. महाविद्यालयीन कला, वाणिज्य आणि विज्ञान विद्यार्थ्यांच्या सामाजिक आर्थिक स्तराचा त्यांच्या व्यक्तिमत्वावर सार्थक प्रभाव पडत नाही.

### १.५ संशोधनाच्या मर्यादा :

१. प्रस्तुत संशोधन अमरावतील विभागातील (अमरावती, अकोला, बुलढाणा, वाशिम, यवतमाळ) या जिल्हयातील, शहरी भागातील अनुदानित महाविद्यालयीन विद्यार्थ्यापुरतेच मर्यादित आहे.

३. संशोधनामध्ये कला, वाणिज्य आणि विज्ञान शाखेमध्ये अंतिम वर्षामध्ये शिकत असलेले महाविद्यालयीन मुले ३७५ व मुलीं ३७५ अशा प्रकारे एकूण ७५० विद्यार्थ्यांपूरतेच हे संशोधन मर्यादित आहे.

५. प्रस्तुत संशोधन महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचा सामाजिक आर्थिक स्तर आणि व्यक्तिमत्व या घटकापूरतेच मर्यादित आहे.

**१.६ संशोधनाची पध्दती :**

प्रस्तुत संशोधनासाठी सर्वेक्षण पध्दतीचा वापर करण्यात आला. यामध्ये अमरावतील विभागातील कला, वाणिज्य आणि विज्ञान शाखेतील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे सर्वेक्षण करण्यात आले आहे.

**१.७ संशोधनाची जनसंख्या आणि न्यादर्श :**

अमरावती विभागातील कला, वाणिज्य आणि विज्ञान शाखेमध्ये शैक्षणिक सत्र २०१४-२०१५ मध्ये शिकत असलेले सर्व विद्यार्थी प्रस्तुत संशोधनाची जनसंख्या आहे. या जनसंख्येमधुन यादृच्छिक न्यादर्शन प्रविधीच्या लॉटरी प्रणालीच्या माध्यमातुन महाविद्यालयांची आणि महाविद्यालयीन विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली आहे. त्यामध्ये अमरावती विभागातुन कला शाखेमधुन एकूण २५० विद्यार्थी, वाणिज्य शाखेतुन २५० विद्यार्थी आणि विज्ञान शाखेतुन २५० विद्यार्थी अशाप्रकारे अमरावतील विभागामधील महाविद्यालयांमधून एकूण ७५० विद्यार्थ्यांची निवड या संशोधनासाठी करण्यात आलेली आहे.

**१.८ संशोधनातील चले :**

**स्वतंत्र चल -** सामाजिक आर्थिक स्थिती

**आश्रित चल-** व्यक्तिमत्व

**जनसंख्यात्मक चल-** महाविद्यालयीन विद्यार्थी

**१.९ संशोधनाची साधने :**

प्रस्तुत संशोधनासाठी पुढील प्रमाणित संशोधन साधनांचा अवलंब करण्यात आलेला आहे.

प्रस्तुत संशोधनामध्ये महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या सामाजिक-आर्थिक-स्तराशी संबधित माहिती संकलीत करण्यासाठी **राधेश्याम, सतीशकुमार आणि सिंग राजवीर** यांनी विकसित आणि प्रमाणित केलेली सामाजिक आर्थिक स्तर स्केल (Socio-economic status scale) (हिंदी आवृत्ती) हया चाचणीचा उपयोग करण्यात आला आहे. तसेच व्यक्तिमत्वाशी संबंधित माहितीचे संकलन करण्यासाठी **कपुर एस. डी.** यांनी विकसित केलेली आणि प्रमाणित व्यक्तिमत्व मापन चाचणी १६ PF (हिंदी आवृत्ती) हया चाचणीचा उपयोग करण्यात आला आहे.

**१.१० माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन :**

**परिकल्पना क्र. १ : महाविद्यालयीन स्तरावरील कला, वाणिज्य आणि विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांच्या सामाजिक आर्थिक स्तरामध्ये आणि व्यक्तिमत्वामध्ये सार्थक फरक नाही.**

| चल Variable | प्रसरण स्त्रोत Source of variance | वर्गाची बेरीज Sum of Squares | स्वाधीनता मात्रा DF | मध्यमान वर्ग Mean Square | प्रसरण अनुपात | सार्थकता Sig |
|---|---|---|---|---|---|---|
| सामाजिक आर्थिक स्तर | समुहाच्या मध्ये BSS | ७२५३.१९२ | २ | ३६२६.५९६ | २३.७८० | ०.०५ स्तरावर सार्थक आहे |
| | समुहाच्या अंतर्गत WSS | ११३९२१.७२० | ७४७ | १५२.५०६ | | |
| | एकूण Total | १२११७४.९१२ | ७४९ | | | |
| व्यक्तिमत्व | समुहाच्या मध्ये BSS | ११८९६.७१६ | २ | ५९४८.३५८ | २६.१९८ | ०.०५ स्तरावर सार्थक आहे |
| | समुहाच्या अंतर्गत WSS | १६९६०६.५७७ | ७४७ | २२७.०५० | | |
| | एकूण Total | १८१५०३.२९३ | ७४९ | | | |



महाविद्यालयीन कला, वाणिज्य आणि विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांच्या सामाजिक आर्थिक स्तरामधील मध्यमान दर्शवणारा आलेख



महाविद्यालयीन कला, वाणिज्य आणि विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्वाचे मध्यमान दर्शवणारा आलेख.

वरील सारणी आणि आलेखामध्ये महाविद्यालयीन स्तरावरील कला, वाणिज्य आणि विज्ञान शाखेतील सर्वेक्षित एकूण विद्यार्थ्यांचा सामाजिक आर्थिक स्तर आणि व्यक्तिमत्वामधील सार्थक फरकाचे विश्लेषण करण्यात आलेले आहे. महाविद्यालयीन कला, वाणिज्य आणि विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांच्या सामाजिक आर्थिक स्तराच्या बाबतीत स्वाधीनता मात्रा समुहाच्या मध्ये २ आणि समूहाच्या अंतर्गत ७४७ करिता गणना प्राप्त प्रसरण अनुपात मूल्य २३.७८० आहे. तसेच व्यक्तिमत्वाच्या संदर्भात प्राप्त प्रसरण अनुपात मूल्य २६.१९८ आहे. प्राप्त प्रसरण अनुपात मूल्य ०.०५ सार्थकता स्तरावर अपेक्षीत सारणी मूल्यापेक्षा अधिक आहे याचा अर्थ असा की, महाविद्यालयीन स्तरावरील कला, वाणिज्य आणि विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांच्या सामाजिक आर्थिक स्तरामध्ये आणि व्यक्तिमत्वामध्ये सार्थक फरक आहे.

यामध्ये कला, वाणिज्य आणि विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांच्या सामाजिक आर्थिक स्तराच्या संदर्भात कला, वाणिज्य आणि विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांच्या सामाजिक आर्थिक स्तराचे मध्यमान अनुक्रमे ६८.०४४, ७०.८०० आणि ७५.५७२ आहे. यामध्ये विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांच्या सामाजिक आर्थिक स्तराचे प्रमाण सर्वाधिक असुन कला शाखेतील विद्यार्थ्यांच्या समाजिक आर्थिक स्तराचे प्रमाण सर्वात कमी आहे.

कला, वाणिज्य आणि विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्वाच्या बाबतीत कला, वाणिज्य आणि विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्वाचे मध्यमान अनुक्रमे ९४.४२५, ८६.९९८ आणि ९६.१९० आहे. यामध्ये विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्वाचे मध्यमान सर्वाधिक असुन वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्वाचे मध्यमान सर्वात कमी आहे.

**परिकल्पना क्र. २ : महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या सामाजिक आर्थिक स्तराचा त्यांच्या व्यक्तिमत्वावर सार्थक प्रभाव पडत नाही.**

| चल Variable | प्रसरण स्त्रोत Source of variance | वर्गाची बेरीज Sum of Squares | स्वाधीनता मात्रा DF | मध्यमान वर्ग Mean Square | प्रसरण अनुपात | सार्थकता Sig |
|---|---|---|---|---|---|---|
| एकूण विद्यार्थी | समुहाच्या मध्ये BSS | ५३४.२४९ | २ | २६७.१२४ | १.१०३ | ०.०५ स्तरावर सार्थक नाही |
| | समुहाच्या अंतर्गत WSS | १८०९६९.०४४ | ७४७ | २४२.२६१ | | |
| | एकूण Total | १८१५०३.२९३ | ७४९ | | | |
| कला शाखेतील विद्यार्थी | समुहाच्या मध्ये BSS | ८२१.३४७ | २ | ४१०.६७३ | २.३१४ | ०.०५ स्तरावर सार्थक नाही |
| | समुहाच्या अंतर्गत WSS | ४३८४५.०४७ | २४७ | १७७.५१० | | |
| | एकूण Total | ४४६६६.३९४ | २४९ | | | |
| वाणिज्य शाखेतील विद्यार्थी | समुहाच्या मध्ये BSS | ३४५.२१२ | २ | १७२.६०६ | ०.७८९ | ०.०५ स्तरावर सार्थक नाही |
| | समुहाच्या अंतर्गत WSS | ५४०३८.८०४ | २४७ | २१८.७८१ | | |
| | एकूण Total | ५४३८४.०१६ | २४९ | | | |
| विज्ञान शाखेतील विद्यार्थी | समुहाच्या मध्ये BSS | १३५१.७६२ | २ | ६७५.८८१ | २.४१२ | ०.०५ स्तरावर सार्थक नाही |
| | समुहाच्या अंतर्गत WSS | ६९२०४.४०५ | २४७ | २८०.१८० | | |
| | एकूण Total | ७०५५६.१६७ | २४९ | | | |




महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या सामाजिक आर्थिक स्तराचा त्यांच्या व्यक्तिमत्वावर पडणाऱ्या प्रभावाचे मध्यमान दर्शवणारा आलेख




महाविद्यालयीन कला शाखेतील विद्यार्थ्यांच्या सामाजिक आर्थिक स्तराचा त्यांच्या व्यक्तिमत्वावर पडणाऱ्या प्रभावाचे मध्यमान दर्शवणारा आलेख




महाविद्यालयीन वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांच्या सामाजिक आर्थिक स्तराचा त्यांच्या व्यक्तिमत्वावर पडणाऱ्या प्रभावाचे मध्यमान दर्शवणारा आलेख




महाविद्यालयीन विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांच्या सामाजिक आर्थिक स्तराचा त्यांच्या व्यक्तिमत्वावर पडणाऱ्या प्रभावाचे मध्यमान दर्शवणारा आलेख

वरील सारणीमध्ये महाविद्यालयीन स्तरावरील कला, वाणिज्य आणि विज्ञान शाखेतील सर्वेक्षित एकूण विद्यार्थ्यांच्या सामाजिक आर्थिक स्तराचा त्यांच्या व्यक्तिमत्वावरील प्रभावाचे विश्लेषण करण्यात आलेले आहे यामध्ये स्वाधीनता मात्रा समुहाच्या मध्ये २ आणि समूहाच्या अंतर्गत ७४७ करिता गणना प्राप्त प्रसरण अनुपात मूल्य १.१०३ आहे. प्राप्त प्रसरण अनुपात मूल्य ०.०५ सार्थकता स्तरावर सार्थक नाही. कला शाखेतील विद्यार्थ्यांच्या संदर्भात स्वाधिनता मात्रा समुहाच्या मध्ये २ आणि समुहाच्या अंतर्गत २४७ करिता गणना प्राप्त प्रसरण अनुपात मूल्य २.३१४, वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांच्या बाबतीत प्रसरण अनुपात मुल्य ०.७८९ आणि विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांच्या संदर्भात प्रसरण अनुपात मुल्य २.४१२ आहे. प्राप्त प्रसरण अनुपात मूल्य ०.०५ स्तरावर सार्थक नाही. याचा अर्थ असा की, कला, वाणिज्य विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांच्या सामाजिक आर्थिक स्तराचा त्यांच्या व्यक्तिमत्वावर सार्थक प्रभाव पडत नाही.

**१.११ संशोधनाचे निष्कर्ष** :

१. विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांच्या सामाजिक आर्थिक स्तराचे आणि व्यक्तिमत्वाचे प्रमाण कला आणि वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांच्या तुलनेत अधिक प्रभावी असल्याचे दिसून आले.

२. महाविद्यालयीन सर्वेक्षीत विद्यार्थ्यांच्या आणि कला, वाणिज्य व विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांच्या सामाजिक आर्थिक स्तराचा त्यांच्या व्यक्तिमत्वावर सार्थक प्रभाव पडत नाही. म्हणजे महाविद्यालयीन शाखानिहाय विद्यार्थ्यांची सामाजिक आर्थिक स्थिती त्यांच्या व्यक्तिमत्वाला प्रभावित करीत नसल्याचे दिसून आले.

**संदर्भ ग्रंथ सुची**

१. आफळे, रा. रा. आणि बापट, भा. वे. (१९७३). शिक्षणाचे मानसशास्त्रीय अधिष्ठान. (प्रथमावृत्ती) पुणे : श्री विद्या प्रकाशन.
२. आगलावे, प्रदीप. (१९९९). समाजशास्त्रीय संकल्पना. (व्दितीयावृत्ती). नागपूर : श्री साईनाथ प्रकाशन.
३. उपासनी, ना. के. व कुळकर्णी. (१९८७). नवे शैक्षणिक मूल्यमापन आणि संख्याशास्त्र. पुणे : श्री विद्या प्रकाशन.
४. कुळकर्णी, के. वि. (१९९९). शैक्षणिक मानसशास्त्र. (८ वी आवृत्ती). पुणे : श्री विद्या प्रकाशन.
५. जगताप, ह. ना. (१९८८), शैक्षणिक व प्रायोगिक मानसशास्त्र. (प्रथमावृत्ती). पुणे : नुतन प्रकाशन.
६. देशपांडे लीना (१९९९), सर्वेक्षण : एक संशोधन पध्दती (प्रथमावृत्ती). नाशिक : य.च.म.मु. विद्यापीठ.
७. दांडेकर, वा. ना. (२०००), शैक्षणिक व प्रायोगिक मानसशास्त्र. (सहावी आवृत्ती). पुणे : श्री विद्या प्रकाशन.



राजश्री प्रसाद पानसे
पीएच्. डी. संशोधक, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ अमरावती.



सुषमा मुकुंद गणोजे
मार्गदर्शक , शासकीय शिक्षण महाविद्यालय, अकोला.